# सायबरबाबत जनजागृती केल्याने विद्यापीठाला चार पुरस्कार प्राप्त



पुरस्काराने गौरवण्यात आलेल्या विद्यार्थ्यांसोबत कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी.

**प्रतिनिधी** | जळगाव

क्विक हेल फाउंडेशनतर्फे देण्यात येणाऱ्या सायबर सुरक्षा पुरस्कारात कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाला चार पुरस्कार प्राप्त झाले आहेत. पुण्यात झालेल्या एका समारंभात या पुरस्कारांचे वितरण झाले. यात कुणिका खैरनार आणि दर्शना हिरे या विद्यार्थिनींना बेस्ट प्रोसेस कॉम्प्लिअन्स हा अवॉर्ड देण्यात आला. तसेच गायत्री ठाकरे आणि श्रेया भोंबे या विद्यार्थिनींना बेस्ट प्रोग्राम आऊटरिच इम्पॅक्ट हा अवॉर्ड देण्यात आला.

क्विक हेल फाउंडेशन व विद्यापीठातील संगणक शास्त्र प्रशाळा यांच्यात सामंजस्य करार झाला असून, या करारान्वये शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये प्रशाळेच्या ३८ विद्यार्थ्यांनी सायबर सुरक्षेच्या बाबतीत जनजागृती केली. खान्देशातील १०० शाळा, महाविद्यालयांमध्ये जाऊन ४० हजार विद्यार्थी, १० हजार सामान्य नागरिकांमध्ये सायबर सुरक्षेचे प्रबोधन केले. याबद्दल सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा अवॉर्डचे वितरण पुणे येथे झाले. या वेळी कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी, क्विक हेलच्या मुख्य कार्यकारी अधिकारी अनुपमा काटकर आदी उपस्थित होते.

## यांचा झाला सन्मान

'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा अवॉर्ड-२०२४' हा विद्यापीठातील संगणकशास्त्र प्रशाळेला देण्यात आला. बेस्ट प्रोसेस कॉम्पियन्स हा अवॉर्ड प्रशाळेतील प्रा. राजू आमले, प्रा. सुरेंद्र कापसे, प्रा. मनोज पाटील यांना, बेस्ट मीडिया अँड आऊटरिच हा अवॉर्ड संगणकशास्त्र प्रशाला आणि विद्यापीठाला देण्यात आला.